केसरी

पुणे, १० एप्रिल २०१०/३

# बिर्ला रुग्णालयात 'मेडरेकॉन १०' परिषद

पिंपरी : चिंचवडच्या आदित्य बिर्ला रुग्णालयात 'हेल्थ रेकॉर्ड असोसिएशन ऑफ इंडिया' (एचआरएआय) यांच्या सहकार्याने दोन दिवसीय 'मेडरेकॉन १०' ही दहावी राष्ट्रीय वार्षिक परिषद नुकतीच पार पडली.

महाराष्ट्रात प्रथमच ही परिषद झाली असून न्याय वैद्यकीय व्यवस्थापन हा या परिषदेचा विषय होता. देशभरातून अडीचशे जण यामध्ये सहभागी झाले होते. आरोग्यक्षेत्रात वैद्यकीय कागदपत्रांचे व्यवस्थापन कसे करावे याचे मार्गदर्शन यात करण्यात आले. या परिषदेत न्याय वैद्यकीय व्यवस्थापन आणि त्याच्या कागदपत्रांची देखभाल याबाबतची माहिती देण्यात आली. न्याय वैद्यकीय क्षेत्रातील विविध प्रश्न आणि कागदपत्रांची प्रक्रिया यावर मान्यवरांची चर्चा झाली.

यावेळी बोलताना रुग्णालयाचे प्रमुख कार्यकारी अधिकारी डॉ. एस. पी. सिंह म्हणाले, 'मेडरेकॉनच्या निमित्ताने या क्षेत्रातील माहितीचे आणि ज्ञानाची देवाणघेवाण झाली. भारतीय उद्योग क्षेत्रात आरोग्य, न्यायवैद्यक आणि त्याच्या कागदपत्रांची देखभाल याचे महत्त्व वाढत आहे. त्यासाठी तज्ज्ञांनी यावर लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे असे ते म्हणाले.

'एचईआरएआय'चे अध्यक्ष सी. गोविंदराजन म्हणाले. यापुढे रुग्णालयांना वैद्यकीय नोंदणीचे व्यवस्थापन करण्यातून सूट मिळणार नसून प्रत्येक रुग्णालयांना यापुढे वैद्यकीय नोंदणी ठेवणे हे कायद्याने बंधनकारक होणार आहे. माहिती तंत्रज्ञानातील प्रगती, गुणवत्ता नियंत्रण बदलणारे मापदंड हे रुग्णालयाच्या मूल्यांकनासाठी महत्त्वाचे ठरणार आहेत. वैद्यकीय कागदपत्रे हाताळणारे, रुग्णालयातील प्रशासकीय विभागातील कर्मचारी, माहिती तंत्रज्ञान आणि कायदा अशा क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी हे चर्चासत्र उपयुक्त ठरले असल्याचे ते म्हणाले.

'मेडरेकॉन १०'मध्ये घेण्यात आलेल्या २५ सत्रांमधून परिषदेत सहभागी झालेल्यांना आपले अनुभव व्यक्त करण्याची संधी मिळाली. माहिती तंत्रज्ञान आणि अद्ययावत संवादयंत्रणा या माध्यमाचा उपयोग करून वैद्यकीय नोंदणी अद्ययावत करण्याबाबत यात चर्चा करण्यात आली. माहिती तंत्रज्ञानाचा आरोग्यक्षेत्रावर झालेला परिणाम, वैद्यकीय नैतिकतेचा प्रश्न, पोलीस आणि न्यायालयीन कामाची पूर्तता यावर या परिषदेत भर देण्यात आला.